मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# महापालिका निवडणूक आरक्षण प्रक्रिया सुरु

## पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्तांकडे आरक्षण प्रक्रियेची जबाबदारी राहणार

**पिंपरी | प्रतिनीधी**

महापालिका निवडणुकीसाठी आरक्षण निश्चितीसाठी राज्य निवडणूक आयोगाने मागदर्शक अध्यादेश जारी केला आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्तांकडे आरक्षण प्रक्रियेची जबाबदारी राहणार आहे. त्यानुसार आयुक्तांकडून आयोगाच्या सूचनेनुसार लवकरच आरक्षण सोडतीची कार्यवाही केली जाणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या कार्यक्रमानुसार आयुक्तांकडून प्रथम आरक्षित जागांची संख्या निश्चित करून त्यास आयोगाची मान्यता घ्यावी लागणार आहे. त्यानंतर प्रत्येक प्रभागातील जागांचे आरक्षण, सोडत प्रक्रिया, हरकती व सूचनांचा विचार आणि अंतिम अधिसूचना या सर्व टप्प्यांची अंमलबजावणी करण्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.




### अशी असेल प्रक्रिया

» अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मागासवर्ग आणि सर्वसाधारण महिलांसह सर्व प्रवर्गातील महिला आरक्षणाची सोडत सार्वजनिकपणे आयोजित होणार

» राज्य निवडणूक आयोगाच्या मंजुरीनंतर महापालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली सभा घेऊन सोडतीची प्रक्रिया होईल

» सोडतीचा दिनांक, वेळ आणि स्थळ वृत्तपत्रे, नोटीस बोर्ड, आणि वेबसाइटवरून जाहीर होणार

» सोडतीनंतर नागरिकांना आरक्षणावर हरकती व सूचना नोंदविण्यासाठी कालावधी मिळणार

» सर्व हरकतींची नोंदवही ठेवून त्यांचा विचार करून आवश्यक सुधारणा प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगास पाठविण्यात येणार

» आयोगाच्या अंतिम मान्यतेनंतरच आरक्षणाची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिद्ध केली जाईल.

नुकतीच महापालिकेसाठी ३२ प्रभागांची अंतिम रचना निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार १२८ नगरसेवक असणार आहेत. आता आरक्षण सोडतीचा कार्यक्रम पार पडला जाणार आहे. त्याकडे सर्व इच्छुकांचे लक्ष लागले होते. त्यानुसार या आरक्षण सोडतीला देखील लवकरच मुहूर्त लागण्याची शक्यता आहे. प्रभागांची रचना अंतिम करताना तीन प्रभागांत काही बदल झाले आहेत. त्यानुसार आरक्षणातही काही प्रमाणात बदल होतील.

**२०१७ ची महापालिका आरक्षण स्थिती**

प्रवर्ग/प्रभाग क्रमांक

- अनुसूचित जाती/१, ४, १६, १९, २४, २७, २९, ३०, ३१, ३२ सर्व (अ.)
- अनुसूचित जाती महिला/ ८, ९, १०, ११, १३, २०, २१, २३, २५, २६ सर्व (अ)
- नागरिकांचा मागास प्रवर्ग/ ३, ५, ७ (अ), १० (ब), १२ (अ), १३ (ब), १४, १५, १७, १८ (अ), २०, २१ (ब), २२ (अ), २३ (ब), २६ (ब), २८ (अ), २९ (क).
- ४) नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला/ १, २ (अ), ३ (ब), ४ (क), ६, ८, ११, १२, १६, १८, १९, २३, २४, २५, २७, ३०, ३१, ३२ (ब)
- ५) अनुसूचित जमाती/ ४ (ब)
- ६) अनुसूचित जमाती महिला/ ६ (अ), २९ (ब)
- ७) सर्वसाधारण/१(ड), २ (क, ड), ३, ५ (ड), ६ (क, ड), ७ (ड), ८ (क,ड), ९,१० (क, ड), ११ (क, ड), १२, १३, १४, १५, १६, १७, १८, १९, २०, २१, २२ (ड), २३ (क,ड), २४ (ड), २५ (क,ड), २६, २७, २८, ३०, ३१, ३२ (ड).
- सर्वसाधारण महिला/१ (क), २ (ब), ३ (क), ४ (ड), ५ (ब,क), ७ (ब,क), ९, १० (क), १२, १३ (क), १४, १५ (ब,क), १६ (क), १७ (ब.क), १८, १९, २०,२१ (क), २२ (ब,क), २४, २६, २७ (क), २८ (ब, क), २९ (ड) ३०, ३१, ३२ (क).

# महानगरपालिकेत अधिकाऱ्यांचे खाते बदल व अतिरिक्त कार्यभार वाटप

## पंकज पाटील यांच्याकडे कर संकलन आणि निवडणूक विभागाची जबाबदारी

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशानुसार विविध विभागांतील अधिकाऱ्यांचे खाते बदल आणि अतिरिक्त कार्यभाराची जबाबदारी त्यांचेवर सोपविण्यात आली आहे.

महापालिकेमध्ये निवडणूक व जनगणना आणि कर आकारणी व संकलन विभाग अशा दोन विभागाचे कार्यभार सांभाळणारे





सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांची बदली नागपूर येथे बदली झाली. यामुळे रिक्त झालेल्या कर आकारणी व संकलन विभागाचा अतिरिक्त कार्यभार क्रीडा विभागाचे उप आयुक्त पंकज पाटील यांच्याकडे (क्रीडा विभागासह) सोपविण्यात आला आहे.

तर आरोग्य विभाग आणि स्वच्छ भारत अभियान विभागाचा कार्यभार पाहणारे उप आयुक्त सचिन पवार यांना निवडणूक व जनगणना विभागाचा कार्यभार देण्यात आला आहे.

दरम्यान, नागरी सुविधा केंद्राचे उप आयुक्त प्रदीप ठेंगल यांच्याकडे आरोग्य विभाग आणि स्वच्छ भारत अभियानचा (नागरी सुविधा केंद्रासह ) अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.

महानगरपालिकेच्या प्रशासकीय कार्यात गती, समन्वय आणि कार्यक्षमतेसाठी करण्यात आलेल्या या फेरबदलामुळे विविध विभागांमधील कामकाज अधिक प्रभावीपणे पार पाडण्यास मदत होणार आहे.

# शेतकऱ्याच्या नवजीवनची सुरुवात करण्यासाठी 106 गोधन दान

## गरजवंत शेतकऱ्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते निखिल बोऱ्हाडे यांचाही मदतीचा हात





**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंदू भूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष तथा भोसरी विधानसभेचे हिंदुत्ववादी आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने मराठवाडा आणि सोलापूर सह अन्य जिल्ह्यातील पूरग्रस्त शेतकरी यांना 106 गोधन दान करण्यात आले.

या उपक्रमात भाजपचे सामाजिक कार्यकर्ते तथा मोशी भागातील युवा नेतृत्व निखिल बोऱ्हाडे यांनी ही मदतीचा हात पुढे करत... एक हात मदतीचा या उपक्रमांतर्गत पहिल्या टप्प्यात जीवनावश्यक वस्तू व अन्नधान्य स्वरूपात पूरग्रस्तांना मदत म्हणून पाठविण्यात आली होती.100 हून जास्त अधिक गावांमध्येही त्यांची मदत शेतकऱ्यांना मिळाली तर दुसऱ्या टप्प्यात गरजवंत शेतकऱ्यांना गायींचे गोधन दान करण्यात आले.या उपक्रमात सामाजिक कार्यकर्ते निखिल बोऱ्हाडे यांच्या वतीने 2 गाई, दोन टन चारा, 200 किलो गोळी पेंड, दोन वैद्यकीय किट देण्यात आल्या. या अभिनव उपक्रमाचे उद्घाटन भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

विविध स्वयंसेवी संस्था, संघटना, उद्योजक, व्यापारी क्षेत्रातील संकलित केलेले गोधन पूजन करून पूरग्रस्त भागात रवाना करण्यात आले.

यावेळी निखिल बोऱ्हाडे यांनी आपल्या प्रतिक्रिया देताना सांगितले की शेती,माती आणि संस्कृती प्रति कटिबद्ध राहण्याची शिकवण धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांनी दिली.त्यांच्या स्टॅच्यू ऑफ हिंदू भूषण शंभूसृष्टी येथे गोधनाचे पूजन करण्यात आले.या उपक्रमात किमान 100 पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू उमटले.यामुळे पुरग्रस्त शेतकरी कुटुंबाची आर्थिक घडी पूर्ववत होण्यास मदत होईल असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.तसेच ज्या दानशूर व्यक्तींनी या उपक्रमात सहभाग घेतला त्यांचे मनापासून आभार मानले.

---

# सक्षम सोशल फाउंडेशन यांच्यावतीने दिवाळी फराळ कार्यक्रम संपन्न

## आतिश बारणे व संतोष बारणे यांच्या पुढाकारातून आदिवासी भागातील दिवाळी गोड



**पिंपरी | प्रतिनीधी**

दिवाळी सर्वांना आनंदाची जावो, सर्वांना सर्व सुख सुविधा मिळो, अशा दिवाळीच्या शुभेच्छा आपण देत असतो. अशाच या दिवाळीच्या शुभेच्छा सर्व स्तरातील कुटुंबांना देण्याचा उपक्रम अनेक वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पिंपरी चिंचवड शहर उपाध्यक्ष आतिश बारणे यांच्या सक्षम सोशल फाउंडेशन च्या वतीने राबविण्यात येतो.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिवाळीचा आनंद सर्वांसोबत वाटण्याचा हा उपक्रम आतिश बारणे यांच्या पुढाकाराने तसेच प्रसिद्ध उद्योजक संतोष बारणे यांच्या सहकार्याने राबविण्यात आला.

यावेळी आदिवासी भागात दिवाळी फराळ वाटप करून दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यात आला. यामध्ये भोमाळे गाव, दीप नगर, शिरगाव-विठ्ठलवाडी, टोकावडे आणि भिसे वस्ती या भागांमध्ये दिवाळी फराळ वाटप करून दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.हा उपक्रम म्हणजे फक्त फराळ नव्हे, तर आनंद द्विगुणित करण्याचा व समाजाची बांधिलकी जपण्याचा उपक्रम असल्याची प्रतिक्रिया ही यावेळी आतिश बारणे यांनी व्यक्त केली आहे.

---

# अभ्यासाच्या ताणातून विद्यार्थ्याने उचललं टोकचं पाऊल; रावेतमधील दुर्दैवी घटना

## 18 वर्षीय विद्यार्थ्याने राहत्या खोलीत गळफास घेऊन आत्महत्या



**पिंपरी | प्रतिनीधी**

रावेत येथील साई मंगल सोसायटीमध्ये राहणाऱ्या १८ वर्षीय विद्यार्थ्याने राहत्या खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना सोमवारी पहाटे पावणेतीनच्या सुमारास उघडकीस आली. अवधूत अरविंद मोहिते (वय १८, रा. साई मंगल सोसायटी, रावेत; मुळगाव – वाखरी, ता. फलटण, जि. सातारा) असे मृत विद्यार्थ्याचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अवधूत हा रावेत येथील पीसीसीओ कॉलेजमध्ये बारावी वर्गात शिक्षण घेत होता. सोमवारी पहाटे त्याने आपल्या खोलीतील सिलिंग फॅनला नायलॉन दोरीच्या सहाय्याने गळफास घेतला. काही वेळाने ही घटना त्याच्या रूममेटच्या लक्षात आली. त्याने तत्काळ शेजाऱ्यांच्या मदतीने अवधूतला जवळच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचार सुरू करण्यापूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

अवधूत हा अभ्यासू आणि शांत स्वभावाचा विद्यार्थी होता. गेल्या काही दिवसांपासून तो अभ्यासाच्या ताणात असल्याची माहिती त्याच्या मित्रांनी व नातेवाईकांनी दिली. अभ्यासाच्या ताणातून त्याने आत्महत्या केल्याची शक्यता नातेवाईकांनी पोलिसांशी बोलताना व्यक्त केली आहे. रावेत पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

# वाद मिटला ! जैन बोर्डिंगचा जमीन खरेदी व्यवहार अखेर रद्द

## पुण्यातील मॉडेल कॉलनी येथील जैन बोर्डींग ट्रस्टसोबतचा जागेचा व्यवहार रद्द करण्याचा निर्णय बिल्डर विशाल गोखलेंनी घेतला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील मॉडेल कॉलनी येथील जैन बोर्डींग ट्रस्टसोबतचा जागेचा व्यवहार रद्द करण्याचा निर्णय बिल्डर विशाल गोखलेंनी घेतला आहे. हा निर्णय गोखलेंनी ई-मेलद्वारे ट्रस्टला कळवल्याचे समोर आले आहे. नैतिकतेच्या मुद्द्यावर व्यवहारातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्याचं गोखलेंनी म्हटले आहे. काल रात्री गोखले बिल्डर यांनी संबंधित ट्रस्टींना 'आपण व्यवहार रद्द करत असून, माझे पैसे परत द्या' असा मेल केला आहे.

मागील काही दिवसांपासून जैन समाजाच्या बोर्डिंग जमीन व्यवहार प्रकरणी भाजपचे नेते केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचे नाव समोर आले होते. याप्रकरणी शिवसेना (शिंदे गट) नेते माजी आमदार रवींद्र धंगेकर दररोज नवीन आरोप करत आहेत. विविध पुरावे दाखवत रवींद्र धंगेकर यांच्याकडून मोहोळ यांच्याविरोधात मालिका संपवायला मागे हटत नव्हते. दुसरीकडे मोहोळ यांनी या व्यवहाराशी आपला काही संबंध नसल्याचं स्पष्ट केलं होतं, तसंच विशाल गोखले हा बिल्डर माझा मित्र होता, आहे आणि राहणारच अशी भूमिका घेतली होती

दरम्यान, काल मध्यरात्री १.२० वाजता केंद्रीय मंत्री अमित शहा मुंबईत दाखल झाले. एकीकडे अमित शहा यांचा मुंबई दौरा आणि त्याच दिवशी हा व्यवहार रद्द होणं आणि एकनाथ शिंदे यांनी रवींद्र धंगेकर यांना दोन दिवस काही न बोलण्याचा निरोप देणे हा एक नवा डाव तर नाही ना... अशी चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगली आहे

पुण्यातील मॉडेल कॉलनी येथील जैन बोर्डींग ट्रस्टसोबतचा जागेचा व्यवहार रद्द करण्याचा निर्णय बिल्डर विशाल गोखलेंनी घेतला आहे. हा निर्णय गोखलेंनी ई-मेलद्वारे ट्रस्टला कळवल्याचे समोर आले आहे. नैतिकतेच्या मुद्द्यावर व्यवहारातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्याचं गोखलेंनी म्हटले आहे.




### ....तोपर्यंत आमचा लढा सुरूच राहणार

» त्या ठरावानंतर गोखले बिल्डर्स यांनी आमच्या विनंतीला मान दिला. जमीन विक्रीचा व्यवहार रद्द करण्यात यावा, अशी विनंती गोखले बिल्डर्सकडून एचएनडी ट्रस्टींना मेलद्वारे करण्यात आली आहे. तसेच, 'आम्ही ट्रस्टींना २३० कोटी रुपये दिले आहेत, ती रक्कम आम्हाला देण्यात यावी, अशी मागणी गोखले बिल्डर्सकडून करण्यात आली आहे. सध्या गोखले बिल्डर्स यांचे नाव येथील मालमत्तेवर आहे. जोपर्यंत एचएनडी (HND) यांचे नाव लागत नाही आणि जैन बोर्डिंग पहिल्यासारखे सुरू होत नाही, तोपर्यंत आमचा लढा सुरूच राहणार आहे," असेही त्यांनी स्पष्ट केले.

### शिंदेंचा रवींद्र धंगेकरांना योग्य निरोप

» दुसरीकडे, रविवारी एकनाथ शिंदे हे आळंदी दौऱ्यावर आले होते. यावेळी रवींद्र धंगेकर यांनी त्यांची भेट घेतली. उपमुख्यमंत्री यांनी माध्यमांशी बोलताना, त्यांना समज दिली आहे आणि योग्य तो निरोप दिला आहे असल्याचं थेटपणे जाहीर केलं. यानंतर रविवारी संध्याकाळी माजी खासदार राजू शेट्टी यांनी जैन बोर्डिंग बाबत मागे हटणार नाही अशी भूमिका जाहीर केली. मात्र रात्री ११.३० वाजता पत्रकार परिषद घेत त्यांना मुरलीधर मोहोळ यांनी व्हॉट्सअ‍ॅपवर विशाल गोखले यांनी ट्रस्टी यांना मेल करून हा व्यवहार रद्द झाल्याचे जाहीर केलं.

### राजू शेट्टी काय म्हणाले?

» या संपूर्ण प्रकरणाबाबत माजी खासदार राजू शेट्टी म्हणाले, "पुणे शहरातील मॉडेल कॉलनी भागामध्ये जैन समाजाची बोर्डिंगकरिता असलेली साडेतीन एकर जमीन विकण्याचा निर्णय ट्रस्टींनी घेतला. तो चुकीचा आणि बेकायदेशीर निर्णय होता. त्या व्यवहाराबाबत अनेक दिवसांपासून लढा सुरू होता. तो व्यवहार रद्द करण्यासाठी देशभरातील ८६ हून अधिक संघटनांची बैठक झाली. त्या बैठकीमध्ये एक ठराव करण्यात आला होता, तो म्हणजे जमीन विक्रीचा व्यवहार ट्रस्टींनी रद्द करावा, तसेच गोखले बिल्डर्स यांनी जमीन खरेदीचा निर्णय रद्द करावा, असा विनंती करणारा ठराव बैठकीमध्ये करण्यात आला होता.

# दुर्मीळ आजारांच्या उपचारांसाठी महात्मा फुले योजनेत 'कॉर्पस फंड'

## हृदय, फुफ्फुस, यकृत व बोनमॅरो प्रत्यारोपणाचा खर्च शासन उचलणार; गरीब रुग्णांना दिलासा

**पुणे | प्रतिनिधी**

दुर्मीळ आजारांवरील महागडे उपचार आणि अवयव प्रत्यारोपणासाठी गरजू रुग्णांना मदत मिळावी, यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. 'महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना' (एमजेपीजेएवाय)अंतर्गत 'कॉर्पस फंड' तयार करून या उपचारांचा खर्च भागविण्यात येणार आहे. यामुळे हृदय, फुफ्फुस, यकृत आणि बोनमॅरो प्रत्यारोपणासह कॅथेटरच्या साहाय्याने होणाऱ्या झडपा बदलाच्या प्रक्रियांसाठी लागणाऱ्या लाखो रुपयांचा खर्च आता योजनेंतर्गत कव्हर केला जाणार आहे.

कॉर्पस फंडाच्या माध्यमातून उच्च खर्चीक उपचारांसाठी गरीब आणि गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. प्रत्येक कुटुंबाला आधुनिक वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याचे हे एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. आरोग्य विभागाने या बदलांसाठी तामिळनाडूच्या यशस्वी आरोग्य मॉडेलचा अभ्यास केला असून, त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही सर्वसमावेशक आरोग्यकवच उभारण्याची योजना आहे

हृदय, फुफ्फुस, यकृत प्रत्यारोपण, बोनमॅरो ट्रान्सप्लांट आणि हृदयातील खराब झालेल्या झडपांचा (व्हॉल्व) कॅथेटरच्या साहाय्याने बदल अशा उच्च-तंत्रज्ञान उपचारांचा खर्च दहा ते चाळीस लाख रुपयांपर्यंत जातो. आत्तापर्यंत हे उपचार 'महात्मा फुले जन आरोग्य योजना' आणि 'आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना'च्या परिघात नव्हते. मात्र, राज्य सरकारने विशेष समितीच्या शिफारशींनुसार या दुर्मीळ आणि खर्चीक आजारांवरील उपचारांचा समावेश योजनेत करण्याचा निर्णय घेतला आहे.

या दोन्ही योजना एकत्र करून आरोग्य संरक्षण अधिक सर्वसमावेशक करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. नव्या आदेशानुसार, एकत्रित योजनांची अंमलबजावणी राज्य आरोग्य हमी सोसायटीमार्फत केली जाणार असून, विमा कंपन्यांचा सहभाग रद्द करून निधीचे थेट व्यवस्थापन शासनाद्वारे करण्यात येईल.

### ...तर 'त्या' निधीचा वापर रुग्णालय विकासासाठी

» शासकीय रुग्णालयांमार्फत उपचार घेतल्यास त्या रुग्णालयांना मिळणारा निधीच त्यांच्या विकासासाठी वापरता येईल. त्यात 40 टक्के रक्कम औषधे आणि वैद्यकीय साहित्य खरेदीसाठी, 19 टक्के पायाभूत सुविधा उभारणीसाठी आणि 20 टक्के रक्कम डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या प्रोत्साहन भत्त्यासाठी वापरली जाणार आहे. उर्वरित 20 टक्के निधी राज्य आरोग्य हमी सोसायटीकडे राखीव ठेवण्यात येईल.

# इंदापुरात 'महा'गोंधळ! आघाडी ठरेना, पण उमेदवार मैदानात!

## महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातील युतीबाबत अधिकृत निर्णय झाला नसतानाच इच्छुक उमेदवारांनी आपापला प्रचार सुरू केला आहे

**पुणे | प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांचे वारे जोर धरू लागले असून, अजून महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातील युतीबाबत अधिकृत निर्णय झाला नसतानाच इच्छुक उमेदवारांनी आपापला प्रचार सुरू केला आहे. अनेकांनी तर आपली उमेदवारी स्वतःच जाहीर केली असून, यामुळे तालुक्यातील राजकीय तापमान चांगलेच वाढले आहे.

महायुतीमध्ये भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) तर महाविकास आघाडीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि उबा ठाकरे गट (उबाठा) हे पक्ष असले तरी, इंदापूर तालुक्यात एकत्र लढायचे की वेगळे, यावर अजूनही स्पष्ट निर्णय झालेला नाही. राज्यस्तरीय चर्चेचे फेरे सुरू असताना, स्थानिक पातळीवर इच्छुकांनी 'वाट बघत बसण्यात अर्थ नाही' या भावनेनेच प्रचार मोहीम हाती घेतली आहे.

त्यामुळे एका सर्कलमध्ये एकाच आघाडीचे अनेक उमेदवार मैदानात उतरण्याची शक्यता निर्माण झाली असून, यामुळे बंडखोरीची शक्यता अधिक वाढली आहे.शासनाकडून स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची तयारी जवळपास पूर्ण झाली आहे. दिवाळीनंतर तत्काळ कार्यक्रम जाहीर होईल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. त्यानुसार इंदापूर नगरपरिषद, पंचायत समिति आणि जिल्हा परिषद क्षेत्रांमध्ये उमेदवारांनी घराघरांपर्यंत संपर्क मोहिमा, बॅनर, पोस्टरबाजी आणि सोशल मिडियावर प्रचार सुरू केला आहे.



### युती विलंबाचा फटका उमेदवारांना..

**» युतीचा निर्णय न झाल्याने उमेदवारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. जर नंतर युती झाली आणि मतदारसंघांचे वाटप बदलले, तर अनेक इच्छुकांना आपली उमेदवारी मागे घ्यावी लागेल. त्यामुळे उमेदवारांमध्ये नाराजी वाढत असून, याच पार्श्वभूमीवर काही ठिकाणी स्वतंत्र लढण्याच्या हालचालीही सुरू झाल्याची माहिती मिळते.**

### सर्वच पक्ष रणसज्ज..

**» इंदापूर तालुक्यातील या निवडणुकीत भाजप, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार गट), उबाठा, मनसे, वंचित बहुजन आघाडी, आरपीआय आणि अपक्ष उमेदवार असे सर्वच राजकीय गट आणि संघटनांचे प्रतिनिधी रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे तालुक्यातील ही निवडणूक त्रिकोणी नव्हे, तर बहुकोनी होण्याची शक्यता दिसत आहे.**

युतीचा निर्णय न झाल्याने उमेदवारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. जर नंतर युती झाली आणि मतदारसंघांचे वाटप बदलले, तर अनेक इच्छुकांना आपली उमेदवारी मागे घ्यावी लागेल. त्यामुळे उमेदवारांमध्ये नाराजी वाढत असून, याच पार्श्वभूमीवर काही ठिकाणी स्वतंत्र लढण्याच्या हालचालीही सुरू झाल्याची माहिती मिळते.

इंदापूर तालुक्यातील या निवडणुकीत भाजप, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार गट), उबाठा, मनसे, वंचित बहुजन आघाडी, आरपीआय आणि अपक्ष उमेदवार असे सर्वच राजकीय गट आणि संघटनांचे प्रतिनिधी रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे तालुक्यातील ही निवडणूक त्रिकोणी नव्हे, तर बहुकोनी होण्याची शक्यता दिसत आहे.

राजकीय समीकरणे अजूनही अनिश्चित असल्याने मतदारांमध्येही उत्सुकता निर्माण झाली आहे. कोण कोणासोबत? हा प्रश्न सध्या सर्वसामान्यांच्या चर्चेचा प्रमुख विषय ठरला आहे. स्थानिक कार्यकर्त्यांच्या पातळीवर पक्षांतील ताणतणावही वाढू लागले असून, ऐनवेळी 'बंडखोरी'चे फटाके फुटण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.

# आंबेगावच्या राजकारणात मोठा ट्विस्ट! शिंदे गट शरद पवार गटाच्या वाटेवर?

## दिलीप वळसे-पाटलांसमोर अस्तित्वाची लढाई, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दृष्टीने अग्निपरीक्षा ठरणार असल्याचे चित्र दिसत आहे

**पुणे | प्रतिनिधी**

आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या होणाऱ्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आंबेगाव तालुक्याचे चित्र पाहता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अजित पवार गट) दृष्टीने अग्निपरीक्षा ठरणार असल्याचे चित्र सध्यातरी दिसत आहे. गेली 35 वर्ष आंबेगाव तालुक्याचे प्रतिनिधित्व करणारे पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांना 2024 साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत काठावर पास व्हावे लागले. वळसे पाटील यांनी तालुक्याचा सर्वांगीण विकास केला.

तरी देखील तालुक्यातील जनतेने वळसे पाटील यांना काठावरच पास केले. आगामी काळात तालुक्यात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका देखील या अत्यंत चुरशीच्या होणार असल्याचे संकेत आतापासूनच मिळू लागले आहेत.राज्यात भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) तसेच एकनाथ शिंदे गट (शिवसेना) अशी महायुती आहे. मात्र, आंबेगाव तालुक्याचे चित्र पाहता शिवसेना (शिंदे गट) महायुतीपासून अलिप्त राहत असल्याचे पहायला मिळत आहे.

होऊ घातलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये महायुतीतील शिवसेना एकनाथ शिंदे गटाने स्वबळावर लढण्याचा नारा दिला आहे.तालुक्याच्या राजकारणात कदाचित शिवसेना शिंदे गटाने महायुतीत सामील न होता स्वबळावर उमेदवार निवडणूक रिंगणात उतरवले. तर त्याची किंमत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाला मोजावी लागेल. शिवसेनेने महायुतीतून वेगळा निर्णय घेण्याची भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दृष्टीने घातक ठरू शकते.



### शिंदे गट कुठे जाणार..

**» दरम्यान, तालुक्यात शिवसेना उद्धव ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गट आणि शिवसेना एकनाथ शिंदे गट हे एकत्र येऊन राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या विरोधात तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका लढले तर निश्चितच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाच्या दृष्टीने होणारी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक ही अग्निपरीक्षा ठरणार हे नक्की.**

शिवसेना शिंदे गटातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सामील झालेले माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील हे वळसे पाटील यांच्याबरोबर खांद्याला खांदा लावून पक्षाचे निष्ठेने काम करत आहेत. मात्र, आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत वळसे पाटील आणि आढळराव पाटील या दोघांच्याही विचाराचे उमेदवार निवडणूक रिंगणात उतरवणे गरजेचे आहे आणि तसे झाले, तरच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष होणाऱ्या निवडणुकात निर्णायक मते घेऊ शकतो.